ज्योतिर्मया

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १३ वा ❑ भारतीय सौर दिनांक २४ माघ शके १९४७, शुक्रवार दि.१३ फेब्रुवारी २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

विशेष लेख...

''अपंग शारीरिक, मनाने नाही''

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

''अपंग शारीरिक, मनाने नाही'' हे वाक्य दिव्यांग व्यक्तींच्या अदम्य इच्छाशक्तीचे प्रतीक आहे. शारीरिक मर्यादा असतानाही मानसिक खच्चीकरण न करता, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर यश मिळवता येते. अपंगत्व शरीराचे असू शकते, मनाचे नाही; मनाची तयारी असेल तर कोणत्याही संकटावर मात करून कठीण ध्येय गाठता येते, हे यातून स्पष्ट होते.

अपंगत्व हे शरीराच्या एका अवयवापुरते मर्यादित आहे. जोपर्यंत विचार आणि मन कार्यक्षम आहे, तोपर्यंत माणूस अपंग नसून ''दिव्यांग'' आहे.

अशीच एक बातमी समोर आली आहे. कंधार (नांदेड) तालुक्यातील नवरंगपुरा येथील जन्मजात दिव्यांग युवक सूरज उबाळे याने दोन्ही हात नसतानाही पायाच्या अंगठ्याने अतिशय वेगाने लिहित बारावीची परीक्षा दिली. या जिद्दी तरुणाने अपंगत्वावर मात करत इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले असून, त्याच्या या कौशल्याने सर्वांना थक्क केले आहे. अपंगत्व हे शरीराला असते मनाला आणि जिद्दीला नाही'' हे या युवकाने कृतीतून दाखवून दिले आहे.

सोशल मीडियावर या विद्यार्थ्याच्या जिद्दीचे जोरदार कौतुक होत आहे. जन्मतः हात नसतानाही पायाच्या अंगठ्याने लिहितांना त्याच्या लेखनाचा वेग अफाट होता. शारीरिक अपंगत्वावर जिद्दीने विजय मिळवत, त्याने कोणाचीही मदत न घेता पेपर पूर्ण केला. सूरजची ही कामगिरी अपंगत्व हे शरीराला असते, मनाला नाही, हे सिद्ध करते.

अपंगत्व हा एक शारीरिक अपंगत्व आहे, मानसिक किंवा प्रतिभेचा अडथळा नाही. योग्य संधी, प्रबळ इच्छाशक्ती आणि समाजाकडून मिळालेल्या पाठिंब्यामुळे, अनेक अपंग लोकांनी विविध क्षेत्रात यश आणि वैभव मिळवले आहे, हे सिद्ध करून की अपंगत्व हा शाप नाही, तर त्यांची क्षमता दाखवण्याची संधी आहे.

प्रमुख यशस्वी अपंग व्यक्तिमत्त्वे आणि त्यांचे कार्य:

मालती कृष्णमूर्ती होला : पोलिओने ग्रस्त असूनही, तिने स्वतःला एक यशस्वी पॅरा-ॲथलीट म्हणून स्थापित केले, ४००हून अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पदके जिंकली.

निक वुजिसिक : अवयव नसतानाही जन्माला येऊनही, निकने ''लाइफ विदाउट लिम्ब्स'' (सनराईज मेडिकल) या संस्थेद्वारे जगभरात प्रेरक वक्ता बनून एक आदर्श ठेवला आहे.

स्टीफन हॉकिंग आणि हेलेन केलर: या व्यक्तिमत्त्वांनी गंभीर शारीरिक आव्हानांना न जुमानता विज्ञान आणि साहित्य क्षेत्रात जगप्रसिद्ध यश मिळवले.

यशाचे मार्ग:

आत्मविश्वास : स्वतःवर विश्वास ठेवणे आणि आव्हानांना न घाबरणे.

समावेशक समाज : अपंग लोकांना दया नव्हे तर समान संधी आणि सुलभ सुविधा (जसे की सुलभ भारत मोहीम) आवश्यक आहेत.

दृढनिश्चय : शारीरिक मर्यादा असूनही पुढे जाण्याची इच्छाशक्ती.

अपंग लोक हे समाजासाठी ओझे नसून एक शक्ती आहेत.

नाशिकमध्ये राज्यस्तरीय आदिवासी साहित्यिक आणि सांस्कृतिक संमेलन

ज्योतिर्मय साहित्य

नाशिक – शहरात प्रथमच राज्यस्तरीय आदिवासी साहित्यिक व सांस्कृतिक संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून हे संमेलन १४ फेब्रुवारी रोजी पेठरोडवरील प्रादेशिक परिवहन कार्यालयाजवळील शासकीय मुलांचे वसतिगृह येथे होणार आहे. संकल्प आदिवासी युवा जागृती संघटना आणि जिव्हाळा यांच्या पुढाकारातून या संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून विविध साहित्यिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी दिवस भरगच्च असणार आहे.

सकाळी 'संस्कृती दर्शन' फेरीने संमेलनाची सुरुवात होणार असून संध्याकाळी आठ वाजेपर्यंत विविध सत्रे पार पडतील. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी विदर्भातील ज्येष्ठ साहित्यिका कुसुम आलाम असतील. उद्घाटन अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून खा. भास्कर,भगरे तसेच नितीन पवार, दिलीप बोरसे, हिरामण खोसकर या आमदारांसह माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भारती पवार, माजी महापौर रंजना भानसे, आदिवासी आयुक्त लीना बनसोड, उपायुक्त दिनकर पावरा, पोलीस उपायुक्त चंद्रकांत खांडवी, आदिवासी प्रकल्प अधिकारी अर्पिता ठुबे, इत्यादी उपस्थित राहणार आहेत.

संमेलनात आदिवासींचे वास्तव जीवन साहित्यात आहे का ?, या विषयावर परिसंवाद होणार आहे. परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी डॉ. संजय लोहकरे असतील. डॉ. पद्माकर सहारे, डॉ. सुलतान पवार, डॉ. मधुचंद्र भुसारे, साहित्यिक रवी बुधर आणि लेखक राजू ठोकळ हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. मुलाखत सत्रात साहित्यिक देवचंद महाले विविध आदिवासी साहित्यिक, राजकारणी व कलाकारांच्या मुलाखती घेणार आहेत. महिला सत्राच्या अध्यक्षा डॉ. प्रतिभा चौरे असून या सत्रात आदिवासी महिलांच्या प्रश्नांवर चर्चा केली जाणार आहे. यानंतर युवा कवी संतोष पावरा यांच्या सहभागातून नवोदित कवी संमेलन होईल.

निमंत्रित कविसंमेलन ज्येष्ठ कवी तुकाराम धांडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार आहे. याशिवाय सांस्कृतिक फेरी, लघुनाट्य, आदिवासी पारंपरिक नृत्य, चित्रप्रदर्शन आदी कार्यक्रमांचीही रेलचेल असणार आहे. काही लेखकांच्या पुस्तकांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

राज्यातील आदिवासी साहित्य, संस्कृती आणि विचारप्रवाह यांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित या संमेलनास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

स्क्रीनच्या मागचं घर

ज्योतिर्मय साहित्य

पुण्याच्या एका छानशा वसाहतीत तिसऱ्या मजल्यावर टाकळकर कुटुंबाचा फ्लॅट होता. बाहेरून पाहिलं की तो अगदी आदर्श, आधुनिक आणि सुखवस्तू कुटुंबाचा नमुना वाटायचा. दारावरची टापटीप नेमप्लेट ''म. मा. टाकळकर '', बाजूला लावलेली छोटीशी घंटा, कोपऱ्यात दिवा ठेवण्याची जागा, आणि दारासमोर शोभिवंत फ्लॉवरपॉट. पाहणाऱ्याला क्षणात वाटायचं ''वा! किती नीटनेटका परिवार!''

घरात प्रवेश करताच थंडगार एसीचा स्पर्श, भिंतींवर आधुनिक चित्रं, स्वयंचलित पडदे, स्मार्ट स्पीकर्स, डिफ्यूझरचा मंद सुगंध, आणि प्रत्येक कोपऱ्यात तंत्रज्ञानाची झळाळी. वायफायचं जाळं घरभर पसरलेलं होतं. प्रत्येकाच्या हातात मोबाईल, टॅब किंवा लॅपटॉप. सगळं काही 'कनेक्टेड' होतं पण तरीही काहीतरी तुटलेलं होतं.

त्या घरात एक कोपरा मात्र वेगळा होता खिडकीशेजारी ठेवलेली एक जुनी पण स्वच्छ खुर्ची. तिच्या बाजूला एक वही, एक पेन आणि चष्मा. त्या खुर्चीत बसलेले होते माधवराव टाकळकर वय पंचाहत्तर. एकेकाळचे नामांकित मराठी शिक्षक. शब्दांवर अपार प्रेम, विद्यार्थ्यांवर माया, आणि वाचनाची निष्ठा. पण आता त्यांच्या आयुष्यात शांततेची जाड चादर पसरली होती.

पत्नी गेल्यानंतर गावातलं घर ओसाड झालं. मुलगा मकरंदच्या आग्रहाखातर ते पुण्यात आले. ''बाबा, तुम्ही आमच्याकडे या. आम्ही आहोत ना.'' या वाक्यात प्रेम होतं; पण त्या प्रेमाला वेळ नव्हता.

मकरंद आयटी कंपनीत उच्च पदावर. सकाळ त्याची मोबाईलच्या स्क्रीनने उजळायची आणि रात्र त्याच स्क्रीनने संपायची. ब्रेकफास्ट करतानाच लॅपटॉप उघडलेला. ''अर्जेन्ट '', ''डेडलाईन '', ''मीटिंग '', ''क्लायंट '' हे शब्द त्याच्या आयुष्याचे केंद्र झाले होते. ''बाबा, मी नंतर बोलतो. कॉल आहे.'' हे वाक्य रोजचं.

डॉ. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर
पुणे मो. 98500 74418

सून सोनाली सोशल मीडियावर लोकप्रिय. तिचा दिवस ''हाय फ्रेंड्स!'' या वाक्याने सुरू व्हायचा. लाईट, कॅमेरा, ॲक्शन! तिचं हसू हजारो फॉलोअर्ससाठी होतं. पण जेवताना तिच्या चेहऱ्यावर थकवा आणि शून्यता असायची. आजोबांनी ''गुड मॉर्निंग'' म्हटलं, तरी उत्तर रेकॉर्डिंगमध्ये हरवायचं.

नातू सचिन आठ वर्षांचा. त्याचं विश्व गेमिंगमध्ये. बॉम्ब, मिशन, लेव्हल्स, विजय. आजोबा म्हणायचे, ''चल रे, बाहेर बागेत जाऊ.'' तो उत्तर द्यायचा, ''आता नाही, मी मिशनमध्ये आहे!'' गोष्टींच्या जगातून तो ग्राफिक्सच्या जगात गेला होता.

नात ऐश्वर्या कॉलेजमध्ये शिकणारी, आत्मविश्वासी. पण तिचं आयुष्य फिल्टर्स आणि ऑनलाईन असाइनमेंट्समध्ये गुंतलेलं. ती सतत ऑनलाईन होती, पण आजोबांशी 'कनेक्ट' नव्हती.

घरात चार माणसं होती, पण चार वेगवेगळे पडदे होते. संवाद मोबाईलमध्ये होता; नाती 'म्युट' झाली होती.

एका रात्री माधवरावांनी लाल मखमली वही बाहेर काढली. पत्नी गेल्यापासून त्यांनी ती उघडली नव्हती. पण त्या दिवशी त्यांनी पहिलं पान उघडलं आणि लिहिलं

''मनातलं जर बोलून दाखवता आलं नाही, तर नात्यांत शब्दार्थ कुठून येणार?''

त्या दिवसापासून त्यांनी दररोज एक पत्र लिहायला सुरुवात केली.

मकरंदसाठी

''प्रिय मकरंद, तू लहान असताना माझ्या मांडीवर बसून गोष्टी ऐकायचास. आज तुझं साम्राज्य मोठं आहे, पण माझी मांडी रिकामी झाली आहे.''

सोनालीसाठी

''सौ. सुनबाई, फोन बंद करून एकदा माझ्या डोळ्यांत बघ. तिथे तुझ्या वडिलांसारखं कुणीतरी आहे.''

सचिनसाठी

''बबड्या, गेममध्ये राजा हो. पण आजोबांबरोबर शब्दांचा एक खेळ खेळ. मी हरलो तरी चालेल; नातं जिंकलं पाहिजे.''

ऐश्वर्यासाठी

''मुली, तुझ्या चेहऱ्यावर फिल्टर्स आहेत; पण मला तुझं खरं हसू पाहायचं आहे.''

पत्रं लिहिताना त्यांचे डोळे पाणावायचे. पण त्यांनी कोणालाच दोष दिला नाही. फक्त नात्यांची खिडकी हलवून पाहिली.

एके दिवशी दुपारी त्यांना अचानक चक्कर आली. घरात सगळे होते, पण कोणी ऐकलं नाही. ऐश्वर्याला ते अर्धवट बेशुद्ध अवस्थेत दिसले. सर्वांनी घाईघाईने रुग्णालयात दाखल केलं.

डॉक्टर म्हणाले, ''ब्लड प्रेशर नॉर्मल नाही. ताण दिसतो.''

त्या रात्री सोनाली खोली आवरताना वही तिच्या हातात आली. तिने पत्रं वाचली. तिच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. तिने सगळ्यांना बोलावलं. प्रत्येकाने आपापलं पत्र वाचलं. घर पहिल्यांदाच मोबाईलशिवाय शांत बसलं पण ती शांतता वेदनेची नव्हती, जागृतीची होती.

सचिनने आजोबांसाठी हस्ताक्षरात पत्र लिहिलं. ऐश्वर्याने 'फिल्टर' न वापरता एक व्हिडिओ तयार केला ''माझे आजोबा''. सोनालीने एक भावनिक पोस्ट लिहिली

''कधी कधी आपण इतके ऑनलाईन असतो की ज्यांनी आपल्याला जीवन दिलं, त्यांचं हृदय ऑफलाईन होतं.''

ती पोस्ट व्हायरल झाली. हजारो लोकांनी प्रतिसाद दिला. स्क्रीनच्यामागचंघर हा हॅशटॅग एक चळवळ बनला. लोकांनी आपल्या घरातील वृद्धांना पुन्हा ऐकायला सुरुवात केली.

काही दिवसांनी माधवराव बरे होऊन घरी आले. त्या दिवशी घरात एक निर्णय झाला ''रात्रीच्या जेवणाच्या वेळी कोणीही मोबाईल वापरणार नाही.''

सुरुवातीला अवघड वाटलं. पण हळूहळू जेवणाचं टेबल संवादकेंद्र बनलं. गोष्टी, हशा, आठवणी, किस्से. सचिन आजोबांकडून शब्दांचे खेळ शिकू लागला. ऐश्वर्या त्यांच्या कविता ऐकू लागली. मकरंद ऑफिसच्या गोष्टी सांगू लागला. सोनाली कॅमेऱ्याविना हसू लागली.

दर रविवारी 'गप्पांचा अड्डा' सुरू झाला. जुन्या फोटो अल्बममधून काळ पुन्हा जिवंत झाला. काळ्या-पांढऱ्या छायाचित्रांतून रंग उधळले गेले.

सचिनने शाळेत ''आजोबांचं गुपित'' नावाची छोटी नाटिका सादर केली. टाळ्यांचा कडकडाट झाला. त्याला जाणवलं खरा विजय लेव्हल पार करण्यात नाही, तर नातं जपण्यात आहे.

सोनालीने सोशल मीडियावर तंत्रज्ञान वापरलं; पण आता संदेश वेगळा होता ''स्क्रीन वापरा, पण नातं विसरू नका.''

टाकळकर कुटुंब बदललं होतं. मोबाईल संपर्कासाठी होता; संवादासाठी नजर, शब्द आणि सहवास.

खिडकीशेजारी बसलेले माधवराव आता पडद्यामागचे नव्हते. तेच घराचं 'मुख्य लॉगिन' झाले होते मनाशी जोडणारे.

घरात अजूनही – होतं, गॅझेट्स होती, स्मार्ट लाईट्स होत्या. पण आता त्यांच्यापेक्षा महत्त्वाचं काही होतं एकमेकांना ऐकण्याची तयारी.

कारण शेवटी घर भिंतींनी बनत नाही; ते शब्दांनी, वेळेने आणि सहवासाने बनतं.

स्क्रीनच्या मागचं घर खरं तर आपल्या सगळ्यांच्या आयुष्यात आहे. प्रश्न इतकाच आपण पडद्यामागे उभ्या असलेल्या माणसाला पाहतो आहोत का? जरा मोबाईल बाजूला ठेवा. खिडकी उघडा. कोणीतरी शांतपणे तुमची वाट पाहत असू शकतो.

जगून पाहा. आनंद अनुभवा.

***

जात्यावरच्या ओव्या.....

आडाच पाणी
बाया आल्या शेंदायला
सुखा दु:खाची सल
लागल्या सांगायला ||४९६||

आडाच पाणी
पहाटेला उपसल
लेक आली मागोमाग
मला नाही उमगल ||४९७||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

समर्थ रामदास आणि श्रीराम

ज्योतिर्मय साहित्य

श्रीराम आणि हनुमंताची उपासना जाणीवपूर्वक स्वीकारताना समाजातील नेभळटपणा, करंटेपणा, अंगात भिनलेली गुलामीची वृत्ती जावी हा त्यांच्या अंतरीचा हेतू होता. लोकांमध्ये बलोपासनेची आवड निर्माण व्हावी म्हणून त्यांनी गावोगावी मारुतीची स्थापना केली. आखाडे सुरु केले. मारुतीरायांच्या उपासनेतून प्राप्त झालेल्या सामर्थ्याचा उपयोग कसा करायचा हे समजण्यासाठी रामोपासनेचे महत्व सांगितले. राम आणि मारुती यांच्या उपासनेद्वारे लोकांमध्ये नवचैतन्य निर्माण करून समर्थांनी जणू मातीच्या पुतळ्यांमध्ये प्राण फुंकले. राम आणि मारुती यांच्या उपासनेत लोकसंग्रह, समाजकल्याण, मानवता आणि राजकारण ही सर्व तत्वे समर्थांना अंतर्भूत आहेत असे वाटले. (उगवतीचे रंग –विश्वास देशपांडे)

रामराय तर समर्थांच्या मनीध्यानी सतत होतेच. आता जनतेलाही रामभक्तीचे महत्व पटवून देण्यासाठी त्यांनी कृष्णातीरी कार्य सुरु केले. समर्थांचे भारतभ्रमण झालेच होते. त्यातून आलेल्या अनुभवातून ते उद्गारले

बहू हिंडता सौख्य होणार नाही ।
शिणावे परी नातुडे हीत काही ।
विचारे बरे अंतरा बोधवीजे ।
मना सज्जना राघवी वस्ती कीजे ।।

समर्थ म्हणतात

सदा सर्वदा योग तुझा घडावा ।
तुझे कारणी देह माझा पडावा ।।

या दोन ओळी अतिशय महत्वाच्या आहेत. यात दोन गोष्टींची मागणी समर्थांनी रामाकडे केली आहे. पहिली म्हणजे सदासर्वदा तुझे सान्निध्य असावे. तुझा आणि माझा कधीही वियोग होऊ नये. आणि दुसरी गोष्ट म्हणजे तुझ्या कारणात म्हणजेच तुझ्या कार्यातच माझे आयुष्य व्यतीत व्हावे. समर्थांच्या चरित्राकडे दृष्टिक्षेप टाकला असता त्यांच्या या दोन्ही मागण्या रामरायाने पूर्ण केल्याचे दिसते. रामाचा आणि त्यांचा कधीही वियोग झाला नाही. श्रीरामांचे चरित्र, त्यांचा आदर्श ,त्यांची शिकवण यांचा आदर्श त्यांनी समाजापुढे ठेवला. आपले आयुष्य त्यांनी त्यातच व्यतीत केले. श्रीरामाची उपासना करताना त्यांनी श्रीरामांपुढे किती सुंदर आणि भव्य मागणी केली आहे पहा !

कोमळ वाचा दे रे राम । विमळ करणी दे रे राम ।।
प्रसंग ओळखी दे रे राम । धूर्त कळा मज दे रे राम ।।
मागो नेणे दे रे राम । मज न कळे ते दे रे राम ।।
तुझी आवडी दे रे राम । दास म्हणे मज दे रे राम ।।

(क्रमश:)



दासबोध स्तवन

उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

बध्दमुक्तनिरूपण

ज्योतिर्मय साहित्य

(दशक ७ समास ६)

नमस्कार,

सहाव्या समासातील

माध्यान्य भागात आपणपोहचलो आहोत. मी मागे म्हणालेच आहे की वरचेवर खुपच विचार पूर्वक लिखाण अपेक्षित आहे त्यामुळे वाचकांच्या हाती देतान ऊशीर होत आहे आणि याची मला जाणीव आहे पण ऊत्तम ते द्यावे ऊत्तम ते घ्यावे हा विचार मनात कायमचा घर करून असल्याने लिखाणात मर्यादा येत आहेत. सर्व प्रथम मी दिलगिरी व्यक्त करते.

वेद वाड:मयाचा अभ्यास करत असताना अभ्यासकाने ब्रम्हा, विष्णु, महेश, दत्तात्रेय हेच फक्त थोर आणि ज्ञानी पुरूष होऊन गेले असे म्हणणे म्हणजे पढतमूर्खपणा आहे. आणि यावर आपण एक समास पूर्णपणे अभ्यासला आहे.(पढतमूर्खाची लक्षणे)

वेद, उपनिषदांमध्ये भागवत ग्रंथात ऊल्लेखलेला शुक आणि वामदेव यांचा देखील मुक्त व ज्ञानी असा ऊल्लेख आढळतो. हे दोघेही ब्रम्हज्ञानी होते.

या समासात समर्थानी सांगितले आहे की वेदाने पूर्व पक्ष मांडला. त्यांच्या अंगी ब्रम्हज्ञान करून देऊन जीवाला मुक्त करण्याचे सामर्थ्य नसेल तर त्याला कोणीही विचारणार नाही. जीवाला मुक्त करण्याचे सामर्थ्य वेदांच्या ठिकाणी आहे यांत शंकाच नाही. महापुण्य पदरी असेल तरचं वेदांचा अभ्यास होईल असे ३० व्या ओवीत प्रत्यक्ष समर्थ आपल्याला सांगतात. पूढे असेही म्हणले आहे की एक पूर्ण श्लोक किंवा अर्धा श्लोक किंवा त्यातील एक भाग किंवा नुसता एक शब्द जरी मनापासून श्रवण केला तर अनेक दोष नाहींसे होतील. वेद,पुराण,शास्त्र यांचा

श्रवणभक्तिने सुध्दख माणुस पवित्र बनून जातो. व्यासांनी भागवत ग्रंथात हेही सांगितले आहे.

मुक्त व ज्ञानी पुरूष देहाने जगात वावरत असताना आपली ब्रम्हाकारता ढळूं देत नाहीत.



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

ज्याला म्हणावें मी 'माझें' । त्यावर माझी सत्ता न गाजे ।। स्वत:चा नाहीं भरंवसा हें अनुभवास येई । परि वियोगाचें दु:ख अनिवार होई ।। तुम्ही विचारी, सुज्ञ आहांत । थोडासा करावा विचार ।। सर्व सत्ता रामरायाचे हातीं । तेथें आपल्या मानवाची काय गति ? ।। विचारानें दु:ख सारावें । सर्वांचें

शेजार असतां रामाचा । दु:खाची, काळजीची, काय वार्ता ।।

समाधान राखावें ।। सर्व केलें रामार्पण । हा नव्हे शब्दांचा खेळ जाण । अर्पण केल्याची खूण । न लागावी काळजी तळमळ जाण ।। परमात्म्याचे रक्षण । कोणतेही स्थळीं, कोणतेही काळीं, असतें हा भरंवसा। याचा अनुभव प्रत्येकास आहे खासा ।। ठेवा रामावर पूर्ण विश्वास । न करावे उपासतापास।। उपास हा शब्द अलिकडील जाण । त्याच्यापुढें एक पाऊल टाकून । उपासनेंत राहावें आपण । तेथें आहे निर्धास्तपण । उपासापुढील ठाण । उपासना मुख्य जाण ।। उपासनेंत राहावें आपण । हेंच रामाचें सान्निध्य जाण ।। शेजार असतां रामाचा । दु:खाची, काळजीची काय वार्ता ? । जैसा सूर्य प्रकाशतां । काळोखाचा नाश होईल तत्त्वता । एवढें आता ऐकावें माझें । राम उतरील सर्व ओझें ।। स्मरतां रामाला । तो देईल समाधानाला ।। देवाकडे करावी विनंति । देहदु:ख अति फार । होई रामाचा विसर । आतां द्या नामाचें अखंड स्मरण । देवा, देह केला तुला अर्पण ।। परमात्मा दयाळू फार । आपले हिताचें करील हा ठेवावा निर्धार ।। मी आहे तुमच्यापाशीं हा ठेवावा विश्वास। न सोडावा आतां धीर । सदा घ्या भगवंताचें नाम । जेणें कृपा करील रघुनंदन ।। राम कृपाळू, दीनांचा नाथ । तो सर्व कांहीं पाहात ।। आपले प्रारब्धानें आलेलें कर्म । ते त्यास न विसरतां करावें अर्पण ।। सुखानें घ्या नामस्मरण । कृपा करील रघुनंदन ।। हा करावा उपाय । तोच समाधानाला नेईल खास ।।

मागील गोष्टींची आठवण । पुढील गोष्टींचें चिंतन । हेंच दु:खाला खरें कारण ।। स्वार्थ म्हणजेच आपलेपण । म्हणून माझा मीच दु:खाला कारण ।। आपण आपलेपणानें वागत गेलें । सुख, दु:ख, चिंता, शोक यांचे मालक व्हावें लागलें ।। सुखदु:खांत चित्ताची न राहे स्थिरता ।। तीच त्याची खरी अवस्था ।। सुखदु:ख परिस्थितीवर नसतें । आपल्या जाणीवेवर अवलंबून राहतें ।। दु:खाचें मूळ कारण। जगत् सत्य मानलें आपण ।।

जोपर्यंत देही मी ही भावना । तोपर्यंत दु:खाच्या यातना ।। सारांश, देहातादात्मक । याचेंच नांव दु:ख ।।

श्री क्षेत्र नैमिष्यारण्य भागवत कथा व हरिनाम सप्ताह

भागवत कथाकार :
आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर
कथेचे श्रवण करताना धावते संकलन
मधुकर बोरीकर 9403061886

दिवस पहिला

पुढे.....

आमच्यात प्रतिकुलतेची अनुकुलतेची पातळी एक एक प्रतिबंध निर्माण करीत असते. आम्हाला अनुकूलतेचा परमार्थ हवा असतो. अभावात सुद्धा आपली साधना अविरत सुरू राहिली पाहिजे. गैरसोयीला जोवर आपण सोय समजत नाही तोवर तो खरा वारकरी होत नाही.

सुमंताला छत्र चामर (अहंकार) सोडण्यास सागितले. नाथ महाराजांनी हे दरवाजे कोणते, याचे सुंदर वर्णन केले आहे. दोष घालविणे व गुण मिळविणे याला परमार्थ म्हणावे.

यातील एखादा दरवाजा तरी या सप्ताहात आपण श्रोत्याने ओलांडावा.

भागवत कथा ही कथा आहे. हे खरे आहे. केन रुपेंन? यातून कथा हा शब्द निघाला. कशा रूपाने हे झाले? यावर जे विस्ताराने सांगितले जाते, त्याला कथा म्हणतात.

भागवतांच्या कथेला एक इतिहास आहे, संदर्भ आहेत.महाभारतातील सर्व पात्रांच्या वृत्तीच्या व्यक्तिरेखा आपल्यात,आपल्या अवती भोवती आहेत.अर्जुन व कृष्ण या दोनही वृत्ती आपल्यातच आहेत.*अस्थिर वृत्तीचा कृष्ण म्हणजे अर्जुन व स्थिर वृत्तीचा अर्जुन म्हणजे कृष्ण*.आपण अस्थिर असू तेंव्हा आपण अर्जुन,आपण स्थिर मनोवृत्तीचे असू तेंव्हा आपण कृष्ण असतो.

आज भागवतांची सुरुवात कदाचित होणार नाही पण भागवताची पूर्व पिठिका मला तयार करायला पाहिजे.

■ भागवत का ऐकावे?

श्रीधरांनी असे म्हटले आहे, मोक्ष मिळावे म्हणून नाही तर भागवत पुन्हा पुन्हा ऐकावे असे वाटले पाहिजे, म्हणून ऐकावे.

भारतात सर्वत्र कीर्तन म्हणजे भजन,गजर असा अर्थ येतो पण महाराष्ट्र मध्ये कीर्तनाला व्यापक केले आहे.कीर्तनात आत्म्याची संगतीने दु:खाची निवृत्ती व नामाने सुखाची प्राप्ती यामुळे कीर्तन महत्वाचे आहे. क्रमश.....

विविध आजारांना दूर ठेवतो 'लेमन टी'/लिंबू-चहा. नियमित घेतल्याने होतात जबरदस्त फायदे...

ज्योतिर्मय साहित्य

दूधयुक्त चहा पिणे आरोग्यासाठी हानिकारकच आहे, तसेच हा चहा दिवसभरात दोन कपापेक्षा जास्त चहा पिऊच नये असे तज्ञही सांगतात...

परंतू, तुम्हाला लेमन टी पिण्यास काहीच हरकत नाही.

कारण, लेमन टी नियमित प्यायल्याने आरोग्य चांगले राहते. लेमन टी प्यायल्याने कोणकोणते फायदे होतात, हे जाणून घेवूयात....

आरोग्याच्या अनेक तक्रारींवर उपयुक्त !!

हल्ली अनेकजण आपल्या आरोग्याबाबत जागरुक झाले आहेत. त्यामुळे व्यायाम आणि आहाराला आरोग्यात अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे.

*चहा म्हणजे भारतीयांचा वीक पॉईंट म्हटले तरीही वावगे ठरणार नाही. मात्र मागच्या काही काळापासून चहा आणि कॉफी आरोग्यासाठी चांगली नसते याबाबत बरीच चर्चा झाली. मग अनेकांनी सामान्य चहा घेणे बंद केले.

मात्र त्यामुळे ब्लॅक टी, लेमन टी/ लिंबू चहा यांसारख्या गोष्टींची मागणी वाढली. लेमन टी बनवणे सोपे असून तो शरीराचा क्लिंझर म्हणून उपयुक्त ठरतो. आता यामध्ये असे कोणते घटक असतात ज्याचे आरोग्याला फायदे होतात. याबाबत फारच कमी जणांना माहिती असते.

लेमन टी म्हणजे नेमके काय?....

लेमन टी म्हणजे कोरा चहा ज्यामध्ये लिंबू पिळलेले असते. लिंबामुळे या चहाला वेगळी चव येते. यामध्ये पाणी, चहा, खडीसाखर किंवा मध आणि लिंबू इतकेच असते. चहात लिंबू पिळल्याने त्याची केवळ चवच नाही तर रंगही बदलतो. कोरा चहा कोमट झाल्यावरच त्यात लिंबू पिळावा आणि मध टाकावा, गरम असताना या दोन गोष्टी टाकू नये याची विशेष काळजी घ्यावी.

क्लिंझर आणि डिटॉक्सिफायर

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

शरीरातील अनावश्यक टॉक्सिन्स बाहेर पडण्यासाठी लेमन टीचा उपयोग होतो.

याबरोबरच शरीरात असणारे विविध संसर्ग आणि आजार दूर होण्यासही लेमन टी उपयुक्त ठरतो.

सर्दी आणि तापावरील उपचार

लेमन टीमुळे सर्दी आणि ताप कमी होण्यास मदत होते. या चहाचा जास्त उपयोग व्हावा यासाठी यामध्ये थोडे आले टाकल्यास फायदा होतो. असा आले घातलेला चहा घेतल्यास घसेदुखीवरही आराम मिळतो. तसेच यामुळे प्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते. तसेच पावसाळी वातावरणात वाजणारी थंडी यामुळे कमी होण्यास मदत होते.

नैसर्गिक अँटीसेप्टीक

लिंबामध्ये निसर्गत: अँटीसेप्टीक गुण असतो. लेमन टीमध्ये अँटी बॅक्टेरीयल आणि अँटी व्हायरल घटक असतात. त्यामुळे एखाद्याला आधीपासून काही इन्फेक्शन किंवा आजार असतील तर ते बरे होण्यास मदत होते.

त्वचेसाठी उपयुक्त

आपली त्वचा छान नितळ असावी असे आपल्यातील बहुतांश जणांना वाटते. लिंबामध्ये व्हिटॅमिन सी असते, जे त्वचेसाठी अतिशय उपयुक्त असते. तसेच लिंबामध्ये ऍस्ट्रींजंटचे घटक असतात. त्यामुळे चेहऱ्यावरील पुरळ कमी होण्यास तसेच त्वचेच्या समस्या कमी होण्यास मदत होते...

(क्रमश:)

लघु बोधकथा

माणुसकी

संस्कृतचे महाकवी माघ निर्धन असले तरी मदत करण्यास कधीच कमी पडत नसत. त्यांच्याकडून जितकी मदत गरजूला होत असे तितकी मदत करण्यास सदैव तयार असत. एकदा कवीराज माघ आपल्या घरी शिशुपाल वध या महाकाव्याचा नववा अध्याय लिहीत असताना दरवाजावर कोणाची तरी हाक ऐकू आली. कोणी हाक मारली हे पाहण्यासाठी ते गेले असता त्यांना दारावर त्यांच्याच गावातील एक गरीब व्यक्ती उभारलेली दिसली. त्यांनी त्या माणसाला आदराने घरात बोलावले. त्याचे योग्य ते आदरातिथ्य केले व येण्याचे प्रयोजन विचारले असता तो गरीब माणूस म्हणाला,'' कविराज मी मोठी आशा ठेवून आपल्याकडे आलो आहे. माझ्या मुलीचा विवाह ठरला असून त्यासाठी मला धनाची गरज आहे. माझी परिस्थिती तर आपण जाणून आहातच. तरी आपल्याकडून मला जी मदत होईल ती माझ्यादृष्टीने खूप मोठी असणार आहे.'' महाकवींकडेही आर्थिक चणचण होती. परंतु दारी मदत मागायला आलेल्या माणसाला परत पाठविणे त्यांना योग्य वाटेना. घरात सगळीकडे शोध घेतला पण त्यांना त्या माणसाला देण्याजोगे काहीच मिळेना. शिवाय दानवीर माणसाच्या घरात मौल्यवान असे काय शिल्लक राहणार. जे होते ते त्यांनी लोकांना देऊन टाकले होते. शेवटी महाकवींचे लक्ष पत्नीच्या हाताकडे गेले. पत्नीच्या हातात सोन्यांचे कंकण होते. त्यांनी एका हातातील कंकण काढून घेतले व त्या गरीब माणसाला देऊन टाकले. गरीब माणसाने महाकवींचे आभार मानून तो बाहेर पडणार इतक्यात कविराजांच्या पत्नीने त्या माणसाला परत बोलावले व आपल्या हातातील दुसरे कंकणही त्याला दिले व म्हणाली,''मुलीच्या लग्नात एकच कंकण कसे तिला देणार तिला रिकाम्या हाताने पाठवू नकोस.'' या दांपत्याच्या दानी वृत्तीला गरीबाने साष्टांग नमस्कार केला.

तात्पर्य – आपली परिस्थिती नसतानाही दुस-याला मदत करणे हीच खरी माणुसकी.

साहित्य आणि संस्कृतीचा अनोखा संगम - 'साहित्योत्सव'

ज्योतिर्मय साहित्य

मानवजातीच्या इतिहासात जर एखादी शक्ती अशी असेल जी काळाच्या पल्याड जाऊन पिढ्यांना जोडते, संस्कृतीला ओळख देते आणि समाजाला दिशा दाखवते, तर ती म्हणजे साहित्य... शब्दांच्या या विश्वात विचारांचे बीज रुजते, भावनांना आकार मिळतो आणि संस्कृतीचे प्रतिबिंब उमटते. साहित्य म्हणजे केवळ कथा-कवितांचा संग्रह नव्हे; ते समाजाच्या आत्म्याचे भाष्य आहे. आणि जेव्हा साहित्य संस्कृतीच्या सहवासात येते, तेव्हा निर्माण होतो एक उत्सव!हा उत्सव विचारांचा, सृजनाचा आणि नवचैतन्याचा...

अशा या प्रेरणादायी वातावरणाची निर्मिती करणारा सोहळा म्हणजे 'साहित्योत्सव-२०२६' - जागर साहित्याचा... युवा मनांचा... अर्थात जागर राष्ट्रनिर्मितीच्या स्वप्नांचा!

आदर्श मूल्यांची परंपरा आणि राष्ट्रनिर्मितीची भूमिका -

भारतीय संस्कृती ही जगातील सर्वात प्राचीन आणि समृद्ध संस्कृतींपैकी एक मानली जाते. वेदांपासून ते संतवाङ्मयापर्यंत, लोककथांपासून ते आधुनिक साहित्यापर्यंत आपल्या शब्दपरंपरेने नेहमीच समाजाला मूल्यांची दिशा दिली आहे. सत्य, करुणा, समता, बंधुता, त्याग आणि कर्तव्य या मूल्यांची रुजवण साहित्यानेच केली. आणि याच मूल्यांवर आधारलेले राष्ट्र सशक्त राष्ट्र म्हणून उभे राहू शकते, या ठाम विश्वासातून अखिल भारतीय साहित्य परिषदेची दिल्ली येथे स्थापना झाली. तो दिवस होता २७ ऑक्टोबर १९६६.

विविध भाषा, विविध बोली, विविध परंपरा या सर्वांना एकत्र आणत भारतीय साहित्याचा सर्वंकष विचार करणारी ही संस्था आज विचारांची एक समृद्ध परंपरा जोपासत आहे.

भारताची खरी ताकद त्याच्या विविधतेत आहे. बंगालीची कोमलता, मराठीची प्रखरता, हिंदीची व्यापकता, तमिळची प्राचीनता, कन्नडची गूढता... प्रत्येक भाषेत एक स्वतंत्र संस्कृती धडधडते... या सर्व भाषांच्या उत्कर्षाचा विचार करून साहित्याचा सेतू बांधण्याचे कार्य ही परिषद सातत्याने करत आहे. कारण भाषा वेगळ्या असल्या तरी भावना एकच असते, ती म्हणजे मानवतेची!

'साहित्योत्सव'... सृजनाचा उत्सव...

साहित्य भारतीचा 'साहित्योत्सव' हा केवळ कार्यक्रम नाही; तो एक अनुभव आहे. येथे शब्द फक्त वाचले जात नाहीत, तर ते जगले जातात. येथे विचार फक्त मांडले जात नाहीत, तर ते मनामनांत झिरपतात. हा उत्सव नवोदित आणि प्रगल्भ, पारंपरिक आणि आधुनिक, ग्रामीण आणि शहरी, सर्वांना समान विचारपीठ देतो. कारण साहित्याला सीमा नसतात; ते मनाच्या आकाशात मुक्तपणे उडते...

युवा साहित्यिक - उद्याच्या विचारविश्वाचे शिल्पकार...

कोणत्याही राष्ट्राचे भविष्य त्याच्या युवकांच्या विचारांवर अवलंबून असते. युवक जर संवेदनशील, विचारशील आणि सृजनशील असतील, तर समाज नक्कीच प्रगत होतो. 'साहित्योत्सव'मध्ये आयोजित कविता, कथा, निबंध आणि नाट्यछटा लेखन स्पर्धा म्हणजे या सृजनशीलतेला दिलेले खुले आमंत्रण आहे... एखादा तरुण जेव्हा पहिली कविता लिहितो, तेव्हा तो फक्त शब्द रचत नसतो, तर तो स्वतः ला शोधत असतो. एखादी कथा जन्माला येते, तेव्हा त्यात अनुभवांचे धागे विणलेले असतात. निबंधातून विचारांची मांडणी होते, तर नाट्यछटांमधून समाजाचे प्रतिबिंब उभे राहते. या स्पर्धा जिंकणे हेच अंतिम ध्येय नसते; तर लेखणीला दिशा मिळणे, आत्मविश्वास वाढणे आणि अभिव्यक्तीला नवे आकाश मिळणे - हेच खरे यश असते...

सकस साहित्य आणि राष्ट्र उभारणी

''राष्ट्र उभारणीत सकस साहित्याचे योगदान'' या विषयावरील विचारमंथन हे या उत्सवाचा वैचारिक केंद्रबिंदू... इतिहास साक्षी आहे, जेव्हा जेव्हा साहित्य जागृत झाले, तेव्हा तेव्हा समाज बदलला. संत तुकारामांच्या अभंगांनी समतेचा संदेश दिला; लोकमान्य टिळकांच्या लेखणीने स्वातंत्र्याची ज्वाला चेतवली; महात्मा फुलेंच्या विचारांनी सामाजिक न्यायाची वाट खुली केली; डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखनाने समतेचे तत्त्व दृढ केले.

साहित्य हे क्रांतीचे बीज असते... ते शांतपणे रुजते, पण एक दिवस संपूर्ण समाजाचा चेहरामोहरा बदलून टाकते. म्हणूनच सकस, विचारप्रधान आणि मूल्यनिष्ठ साहित्य निर्माण करणे ही काळाची गरज आहे.

स्त्री लेखिकांची अभिव्यक्ती- नव्या युगाचा स्वर

''२१ व्या शतकातील स्त्री लेखिकांची अभिव्यक्ती'' या चर्चेतून आधुनिक साहित्याचा एक महत्त्वपूर्ण प्रवाह उलगडतो. आजची स्त्री केवळ शब्दांचा खेळ मांडत नाही; ती स्वतःच्या अस्तित्वाची कथा सांगणारी लेखिका आहे.

तिच्या लेखणीत स्वातंत्र्य आहे, संघर्ष आहे, प्रेम आहे, प्रश्न आहेत आणि परिवर्तनाची आस आहे. ती परंपरेचा आदर राखत नव्या वाटा शोधते. तिच्या शब्दांत कोमलता असली तरी त्यात ताकदही तितकीच आहे.

स्त्रीलेखन म्हणजे समाजाच्या अर्ध्या आकाशाचा आवाज. तो जितका स्पष्ट ऐकू येईल, तितका समाज अधिक समतोल बनेल...

आजचे युवा साहित्य-दिशेचा शोध

आजचा युवकांच्या हातात संपूर्ण विश्व सामावले आहे... मोबाईलच्या एका स्क्रीनवर. पण या अमर्याद माहितीच्या महासागरात साहित्याची दिशा काय असावी?

''आजचे युवा साहित्य कुठे चालले आहे?'' या चर्चेतून आधुनिकतेचे आव्हान आणि संधी दोन्ही समोर येतात. वेग, तंत्रज्ञान आणि बदलत्या जीवनशैलीत साहित्य अधिक थेट, अधिक प्रामाणिक आणि अधिक प्रयोगशील होत आहे.

परंतु या प्रवासात मूल्यांची नाळ तुटू नये, ही काळजी घेणेही तितकेच आवश्यक आहे. आधुनिकतेला स्वीकारताना परंपरेचा हात सोडू नये, याच संतुलनात साहित्याचे सौंदर्य दडलेले आहे.

प्रा.डॉ. सर्जेराव जिगे
निमंत्रक, साहित्योत्सव-२०२६
छत्रपती संभाजीनगर.
मो ९४२१३००८१०

समाजमाध्यमे - विरोध की संधी?

आज अभिव्यक्तीचे सर्वात मोठे व्यासपीठ म्हणजे समाजमाध्यमे. इंस्टाग्रामवरील कविता, फेसबुकवरील लेख, ब्लॉगवरील विचार हे सर्व काही क्षणार्धात हजारो लोकांपर्यंत पोहोचते.

''इंस्टाग्राम आणि कविता - विरोध की संधी?'' हा प्रश्न खरंतर आजच्या काळाचा आणि कळीचा प्रश्न आहे. काहींना वाटते की वेगाने वाचल्या जाणाऱ्या कविता खोली गमावतात; तर काहींना वाटते की यामुळे साहित्य अधिक लोकांपर्यंत पोहोचते.

खरे तर माध्यम बदलते, पण अभिव्यक्तीची गरज बदलत नाही. जर शब्द प्रामाणिक असतील, तर ते कागदावर असोत किंवा स्क्रीनवर - ते मनाला भिडतातच...

वाचन - मनाचा विस्तार

''वाचनाने आम्हाला काय दिले?'' या सत्रात पुस्तकांशी असलेल्या नात्याची नव्याने जाणीव होते. वाचन म्हणजे शांत संवाद... संवाद लेखक आणि वाचक यांच्यातील...

एक चांगले पुस्तक आपल्याला अनेक आयुष्ये जगू देते. ते आपल्याला संवेदनशील बनवते, सहानुभूती शिकवते आणि विचारांना परिपक्व करते. वाचनामुळे माणूस केवळ सुशिक्षित होत नाही, तर सुसंस्कृतही होतो...

उपक्रमांची रंगत- विचार आणि आनंद यांचा मिलाफ

'साहित्योत्सव'ची खासियत म्हणजे त्याची बहुरंगी रूपे. अभिरूप न्यायालय समाजातील प्रश्नांना सर्जनशील पद्धतीने मांडत न्याय, नैतिकता आणि जबाबदारी यांवर विचार करायला भाग पाडते.

कवी संमेलन म्हणजे भावनांचा झरा... जिथे शब्द सुरांत मिसळतात आणि श्रोते मंत्रमुग्ध होतात.

कवी कट्टा मुक्त अभिव्यक्तीचा कोपरा आहे... बंधने नाहीत, फक्त विचारांचा प्रवाह आहे...

अनोखी ग्रंथदिंडी ज्ञानाची पालखी घेऊन समाजातून फिरते आणि वाचनसंस्कृतीचा उत्सव साजरा करते. पुस्तकांविषयीचा आदर आणि प्रेम यांची ही सुंदर परंपरा आहे. ''महाराष्ट्राची लोकधारा'' या सांस्कृतिक कार्यक्रमातून मातीचा सुगंध दरवळतो... लोकगीते, नृत्य, परंपरा आणि जीवनाची सहजता यांचा अविष्कार घडतो...

भूतकाळाचा वारसा, भविष्याची स्वप्ने

'साहित्योत्सव' हा भूतकाळ आणि भविष्य यांच्यातील सेतू आहे. एका बाजूला संतपरंपरेचा वारसा आहे; दुसऱ्या बाजूला डिजिटल युगाची स्वप्ने आहेत. या दोन्ही टोकांना जोडणारा धागा म्हणजे सृजनशीलता...

आजच्या धावपळीच्या जगात माणूस कधी कधी स्वतःपासून दूर जातो. साहित्य त्याला पुन्हा स्वतःकडे घेऊन येते. संस्कृती त्याला त्याच्या मुळांची आठवण करून देते.

साहित्योत्सव - एक चळवळ...

हा उत्सव एका दिवसापुरता मर्यादित नाही; ती विचारांची चळवळ आहे. प्रत्येक सहभागीच्या मनात एक ठिणगी पेटवणारी... काहीतरी लिहावे, काहीतरी वाचावे, काहीतरी बदलावे... अशी प्रेरणा देणारी.

कारण शेवटी राष्ट्राची उभारणी केवळ दगड मातीच्या इमारतींनी होत नाही; तर ती विचारांनी होते. आणि विचार घडवण्याचे सामर्थ्य साहित्यात आहे.

अंततः 'साहित्योत्सव' म्हणजे शब्दांचा सोहळा, संस्कृतीचा उत्सव आणि भविष्याचा दीपस्तंभ! येथे मनांना दिशा मिळते, विचारांना पंख आणि स्वप्नांना आकाश...

चला, या शब्दयात्रेत सहभागी होऊया.

लेखन करूया... वाचन करूया... विचार करूया...

कारण, जिथे साहित्य जागते, तिथे समाज जागतो;

जिथे संस्कृती फुलते, तिथे राष्ट्र उभारते...

आणि म्हणूनच 'साहित्योत्सव' म्हणजे केवळ उत्सव नाही, साहित्य आणि संस्कृतीचा तो संगम आहे... तो नवभारताच्या स्वप्नांना शब्द देणारा प्रकाशोत्सव आहे!

२०,२१,२२ फेब्रुवारी २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर या ऐतिहासिक नगरीत होणाऱ्या अनोख्या साहित्योत्सवात मी सहभागी होऊन या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होत आहे. आपणही हा ऐतिहासिक क्षण अनुभवावा...

***

SWP की अक्षय पात्र ?

महाभारतातील 'अक्षय पात्र' ही कथा पांडवांच्या वनवासातील एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि चमत्कारिक घटना आहे. 'अक्षय' म्हणजे ज्याचा कधीही क्षय (नाश) होत नाही आणि 'पात्र' म्हणजे भांडे.

अक्षय पात्राची प्राप्ती पांडवांना सुर्य देवाच्या आशीर्वादाने झाली.

पांडव जेव्हा वनवासात होते, तेव्हा त्यांच्यासोबत अनेक ब्राह्मण आणि ऋषी-मुनी देखील होते. एवढ्या मोठ्या जनसमुदायाला अन्नाची सोय करणे युधिष्ठिरासाठी कठीण झाले होते. तेव्हा युधिष्ठिराने सूर्यदेवाची कठोर तपश्चर्या केली. त्याच्या भक्तीवर प्रसन्न होऊन सूर्यदेवाने त्याला एक तांब्याचे भांडे दिले, ज्याला 'अक्षय पात्र' म्हटले जाते.

हे पात्र वैशिष्ट्यपूर्ण होते,

याचे वैशिष्ट्य असे की या पात्रातून दररोज अमर्याद अन्न प्राप्त होत असे, ज्यामुळे कितीही लोकांना जेवू घालणे शक्य होते.

पण हे पात्र तेव्हाच रिकामे होत असे जेव्हा द्रौपदी स्वतःचे जेवण पूर्ण करून ते पात्र स्वच्छ करत असे. एकदा द्रौपदीचे जेवण झाले की, त्या दिवशी त्या पात्रातून पुन्हा अन्न मिळत नसे. क्रमशः.....

मूल मराठी लेखक-सचिन वसंत पाटील हिन्दी भावानुवाद-डॉ. मीना श्रीवास्तव

मेहनत की रोटी

आगे.....

उसका पूरा भरोसा आज के आंकडे पर टिका था, वहीं ध्वस्त हो गया। वह गलितगात्र होकर जमीन में धंसता जा रहा था। वह कुछ भी सोचने की स्थिति में नहीं था। उसका दिलोदिमाग सुन्न पड गया। कितने सुनहरे सपने देखे थे, वे सब चुटकी भर में चूर चूर हो गए थे... सोच सोच कर माथा घूमने लगा, अब घरवाली और बच्चों को कैसे मुंह दिखाऊं? उनका भरण-पोषण कैसे करूँ?

वह तंद्रा से जागा। नाक की सीध में दिखने वाली सड़क पर चलने लगा। उसे अपने गाँव से कहीं दूर भाग जाने की इच्छा थी। अनमनासा होकर वह काफी देर तक अकेला चलता रहा। नंगे पैर... दोपहर बीत गई। शाम तक ढलने लगी। एक के बाद एक गाँव पीछे छूटते गए। लेकिन रास्ता खत्म होने का नाम नहीं ले रहा था। उसके पेट में खाने का एक दाना तक नहीं था। यूँ ही निरुद्देश चलते-चलते उसके हाथ-पैर थकावट के मारे चूर चूर हो गए थे। उससे एक भी कदम चला नहीं जा रहा था, सो वह सड़क के किनारे बैठ गया। दूर कहीं से ट्रेन की आवाज़ आ रही थी। अनायास ही उसके मन में बिजली की तरह एक विचार कौंधा! अभी, इसी वक्त रेल की पटरी पर अपने आप को झोंक दूँ और इस बदकिस्मत जीवन का अंत कर दूँ। आखिरकार ऐसे जीते जी मरने का क्या फायदा?

रोज रोज तिल-तिल से मरने की बजाय एक ही बार मरना कहीं बेहतर है। हाय री मेरी फूटी किस्मत, जो मुझे ढंग से अपनी गृहस्थी चलानी नहीं आती, बच्चों की परीक्षा की फीस तक मैं भर नहीं पाता! और तो और बीवी के सामने अब यह मनहूस चेहरा लेकर कैसे जाऊँ? इससे तो बेहतर है कि इस व्यर्थ जीवन का अंत ही कर दूँ.....

उसके मन में छाया अँधेरा चहुँ ओर फैले अंध:कार को और भी गहराई प्रदान कर रहा था। दसों दिशाओं को आगोश में लेते अंधियारे में सर्प के समान सोयी रेल की पटरियों पर वह लेट गया। दिनभर सूरज की गर्मी और रेल गाड़ियों के आवागमन की तपिश को झेलती रेल की पटरियाँ अच्छी खासी गर्म हो गई थीं। उसे अपनी गर्दन पर उन पटरियों का गर्म स्पर्श महसूस हो रहा था। तभी एक विशालकाय रेलगाड़ी अपने विस्तीर्ण बाहु फैलाती उसीकी दिशा में बड़ी तेजी से बढ़ रही थी। रेलगाड़ी की आवाज़ एकदम नज़दीक आती जा रही थी। उसकी छाती की धड़कन उसी रफ़्तार से बढ़ती जा रही थी। एक पल के लिए मानों समूचा विश्व स्तब्ध हो उठा। उसका सम्पूर्ण शरीर उसे एक खोखले कंकाल की भांति प्रतीत हो रहा था। ..... रेलगाड़ी का धड़धड़ करता कम्पन..... बस कुछ पल और..... मृत्युदूत के पाश उसकी गर्दन को जकड़ने ही वाले थे..... क्रमशः

दुकान भाड्याने देणे आहे.
300 स्वेअर फूट दुकान भाड्याने देणे आहे.
डॉक्टरांना प्राधान्य.
इंदुगंगा आर्केड,
राहुल मेडिकलच्या बाजूला,
क्रिकेट स्टेडियम जवळ,
एन 2, मेन रोड,
सिडको छ. संभाजीनगर
संपर्क :
9823195585/ 8149998143

ऑनलाईन औषधोपचार

आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.
Dr Shaikh A H - 98606 99906

कशाला हवा वेलेन्टाइन डे.??

ज्योतिर्मय साहित्य

वर्षात आपण बरेच काही ''दिन-दिवस-आणि डेज'' साजरे करत असतो. त्यातही काही डेज ची विशेष वाट बघितली जाते.जसे फ्रेन्डशिप डे, व्हेलंटाइन डे.आपली मित्रत्वाची भावना, प्रेमाची भावना प्रकट करायला त्या त्या दिवसाची वाट बघावी लागते हीच मोठी शोकांतिकाआहे, असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही. तरीही एकमेकांवर प्रेम असणं, आवश्यक आहे.ते नाकारता येत नाही.प्रेमाने सगळं साध्य होत, ते खोट नाही. प्रेम ही अशी भावना आहे जी व्यक्त झाल्यावर चेहरा खुलतो, बहर येतो, आणि खरंतर तसं पाहिलं तर ती भावना व्यक्त करण्यासाठी कुठल्याही ठरावीक वेळेची, जागेची, आणि दिवसाची गरज नसतेच मुळी आणि नसावी ही.

फेब्रुवारी महिना लागला की तरुण युवक-युवती मध्ये १४ फ ेब्रुवारीच आकर्षण असत ते व्हेलंटाइन डे चं.

आताशात अनेक विवाहितां मध्येही ते असल्याचे दिसते.

मग कुठे जायचं, कुठे भेटायचं,गिफ्ट काय घ्यायच,जेवणाचा कार्यक्रम कुठे? सगळं ठरत असत.

पण हा प्रेम व्यक्त करण्याचा दिवस व्हेलंटाइन डे म्हणून साजरा का केला जातो? का करतो, ह्या विषयी कोणालाही काही माहिती नसते.

सगळ्यांनाच माहीत व्हावा म्हणून व्हेलंटाइन डे विषयी जाणून घेऊ.

रोम मध्ये क्लाडिअस नावाचा राजा होता.तो शिस्तप्रिय,कठोर होता.तसा क्रुरही होता. त्याची काही तत्व होती,ती वेगळी होती. त्याच्या मते प्रेम आणी लग्न माणसाला कमजोर करतात. कामावरून त्यांच लक्ष उडत. युध्दात चांगले लढू शकत नाही. कुटुंबाची चिंता असते. त्याने आपल्या सैनिकांना प्रेम, लग्न न करण्याचा फतवा काढला होता. अर्थातच तो सर्वात मान्य नव्हता. त्याच राज्यात एक संत रहात होते.त्यांच नाव ''व्हेलंटाइन'' होते. जनतेवर हा अन्याय आहे.तो त्यांना मान्य नव्हता. आणि म्हणूनच त्यांनी काही प्रेमिकांची लपूनछपून लग्न लाऊन दिली होती.अर्थातच ही गोष्ट लपून राहणे शक्यच नव्हती. राजाच्या कानावर गेलीच. आपल्या आदेशानुसार न झाल्याने,व्हेलंटाइनला मृत्यूदंड देण्यासाठी आदेश दिला.कारागृहात

त्याची रवानगी झाली.

कारागृहात जेलरच्या मुलीची दृष्टी त्यांनी परत आणून दिली. त्यामुळे मुलीत आणि त्यांच्यात जवळीक झाल्याने,प्रेम निर्माण होते. व्हेलंटाइन मृत्यदंडाचे आधी एक प्रेमपत्र तिला लिहितो. आणि निरोप घेतो.त्यात ''तुझा व्हेलंटाइन''म्हणून सांगता करतो. तोच हा १४ फेब्रुवारीचा व्हॅलेंटाईनचा सेट द व्हॅलेंटाईनचा पुण्यतिथीचा दिवस व्हॅलेंटाईन डे त्याचे नावे साजरा होतो. सगळयांनाच सविस्तर माहीत व्हावे हा उद्देश.

भारतात ही मोठया प्रमाणात

प्रेमीं जनांकडून हा दिवस साजरा होतो.आपल्या प्रिय व्यक्तीला, शुभेच्छा पत्र, गुलाब पुष्प, भेट वस्तू देऊन आपल्या प्रेमभावना व्यक्त करतात. करायला हव्यात.

प्रेमी कोण? सर्वच असतात. प्रत्येकाचे मनात कोणा न कोणाबद्दल प्रेम हे असतच.मनात प्रेमभावना नाही अशी व्यक्ती सापडणे नाही.

आनंदात असणे प्रेम असते. आनंदाने, हसणे, हसवणे प्रेम असते.

गुलाबाचे फुल देणे हेसुद्धा प्रेम असते.

एकमेकांना जपणं हे पण प्रेम असते. एकमेकाला नेहमी सावरणं हे पण प्रेम असते.

मित्र-मित्रात, मित्र-मैत्रिणीमध्ये, पति-पत्नी मध्ये, प्रियकर -प्रेयसी मध्ये आई-वडील -मुलामध्ये. प्रेम असत.अर्थातच प्रत्येकाची प्रेमाची भावना निराळी असते.अपेक्षा निराळ्या असतात. प्रेमाला वयाच बंधन नसत.

आपल्यावर कोणी प्रेम करतय, आपल कोणावर तरी प्रेम आहे, ही भावनाच अतिशय सुखद असते, मनाला आनंद देणारी असते. आपल्या जगण्याला बळ देणारी असते.

आवडल कोणी
तर वेड होऊन जावं
बेधुंद होऊन प्रेम करावं
फुला सारखं जपावं
प्रेमासाठी जगणं व्हावं
वेड होऊन प्रेम करावं....

पण आज सगळ्याच गोष्टींचे अर्थ बदलत चालले आहे. प्रेम म्हणजे नक्की काय? की आकर्षणातून दोघे जवळ येतात. हे हि महत्त्वाचे ठरते. अनेकदा दोघे, फ ेसबुक, वॉटसाप, इन्स्टाग्राम माध्यमातून जवळ येतात.काही वेळा नको इतकी जवळीक साधली जाते, आणि नको ते प्रसंगाना सामोरे जावे लागते. आत्महत्या, हत्या, असे अनेक प्रसंग येतात.. आयुष्य उद्धस्त होतात... हे नकोय. मैत्रीतून एक सुंदर नातं निर्माण व्हावं. विचारांची देवाणघेवाण व्हावी. पण बऱ्याचदा तसे होत नाही आणि म्हणूनच व्हेलंटाइन डे ला अनेकांन कडून विरोध होतो, तो यामुळेच.

आता तर पूर्ण आठवडाच ''व्हेलंटाइन डे आठवडा'' साजरा करण्याचा प्रघात आलाय.रोज डे, प्रपोज डे, चॉकलेट डे, टेडी डे, प्रॉमिस डे, हग डे, किस डे, आणि व्हेलंटाइन डे,असा आठवडा. आपल्या प्रियकराला गुलाब पुष्प देणे,भावना व्यक्त करणे, वचन देणे, चॉकलेट, भेटवस्तू देणे, मिठी मारणे, किस करणे, असे प्रकार येतात, जे आपल्या संस्कृतीत नाही बसत ह्या सगळ्या गोष्टी.म्हणूनच विरोध होतो.खरं प्रेम व्यक्त करायला ह्या सगळ्याची आवश्यकता आहे का? हा प्रश्न. का उगीचच असे प्रकारातून आपल प्रेम जगाला दाखवायचे. संधी साधू प्रेम नकोय.

प्रेम जरूर करा, प्रेमात, आणि प्रेमाने सगळं व्यवस्थित चाललय. प्रेम शब्दाला कमीपणा येईल असे कृत्य करू नका.. प्रत्येकाने प्रेमात रहा,..

आणि हा दिवस प्रेम व्यक्त करण्याचा ''प्रेमाचा दिवस'' म्हणून साजरा करा.संयमाने. एकच दिवस नाही तर सतत प्रेमात रहा... रोजचाच दिवस प्रेममय असूद्या...

पाडगावकर आपल्या कवितेत म्हणतात --

प्रेम कधी रुसणं असतं,
डोळ्यांनीच हसणं असतं,
प्रेम कधी भांडत सुध्दा !
दोन ओळींची चिठ्ठीसुध्दा प्रेम असतं,
घट्टमिठी सुध्दा प्रेम असत
मग सांगा,
प्रेम म्हणजे नक्की काय असतं.?
प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे काय असतं ?
प्रेम म्हणजे.. प्रेम.. असतं.
प्रेम व्यक्त करायला आठवड्याचे..दिवसाचे बंधन कशाला हवे.?

लोकसेवक श्री.अशोकजी नवाल यांच्या कार्याचा गौरव

ज्योतिर्मय साहित्य

बाणेर, पुणे (डॉ श्याम कुलकर्णी) : आज श्रीभगवती मंदिराच्या प्रांगणात दास नवमीचे अवचित्य साधून सेवा सहयोग प्रतिष्ठान यांच्या सहकार्याने नवनिर्वाचित नगरसेवक व नगरसेविका प्रभाग क्रमांक-९ यांचा सत्कार जनसेवेचे दिपस्तंभ श्री.अशोकजी नवाल सरांचा भगवती सेवा आश्रमाचा लोक सेवेचा पुरस्काराचा कार्यक्रम संपन्न झाला.

सर्व प्रथम राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री, तळागळातील दांडगा जनसंपर्क असलेले धुरंधर लोकनेते, पुणे जिल्ह्याचे शिल्पकार व पालक मंत्री स्व.श्री. अजितदादा पवार यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण कारण्यात आली.

या कार्यक्रमास श्री बाबूराव आप्पा चांदेरे, अमोल भैय्या बालवडकर, रोहिणी ताई चिमटे, समाजसेवक राहूल कोकाटे उपस्थित होते. उपस्थितांचे स्वागत श्रीभगवती मंदिराचे विश्वस्त डॉ. शाम दलाल यांनी केले. श्री आप्पा चांदेरे यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यानाची, पाणी पुरवठा, स्वच्छता,जन आरोग्य, रस्ते विकास इत्यादी भविष्यातील विकासाच्या संकल्पना मांडल्या व ते परिपूर्ण करण्याचे वचन

बध्दता व्यक्त केली.

श्रीभगवती सेवा आश्रमाचे आधारस्तंभ व ऊर्जास्त्रोत श्री अशोकजी नवाल सरांचा गौरव चिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. संगणक तंत्रज्ञान हे यशस्वी दिशा देणारे आहे. व या संधीचा वस्तीतील होतकरु विद्यार्थ्यांनी पुरेपूर लाभ घ्यावा. तसेच श्रीभगवती आश्रम सेवेच्या मार्गात येणाऱ्या अडचणी सोडवणूक करण्यासाठी मी सतत प्रयत्नशिल राहिल असे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

सामाजिक बांधिलकी व संस्थात्मक सेवाभाव याचा अनोखा संगम असलेले श्री अशोकजी नवाल सर यांनी वस्ती भागातील विद्यार्थ्यांच्या उज्वल प्रगतीसाठी १०० संगणक संच सेवा आश्रमाला भेट दिल्या मुळे बाणेर प्रभागात १२ नि:शुल्क संगणक प्रशिक्षण केंद्र तीन वर्षा पासून आहेत. त्यामुळे सेवा वस्तीतील गरीब मुलांना आधुनिक तंत्रज्ञान प्राप्त होत आहे. या कार्यक्रमात संगणक तंत्र प्रशिक्षित विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

श्रीभगवती सेवा आश्रमाचे विविध सेवा भावी कार्यक्रमात सहभागी स्वयंसेवकानां स्मृती चिन्ह देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. त्यापैकी पर्यावरण पुरक गणेश मुर्ती कार्यशाळेचे शिल्पकार प्रशिक्षक श्रीकांत कुंभार सर, व्यंकट रमण अय्यर, डॉ.वैजनाथ देशमुख, मधूसुदन साताळकर, संगणक तज्ञांचा पुरस्कार विकास जोशी, दीपाली गोयल, श्रीरंग कूर्हे, रमेश करमरकर, शिल्पा तेंडूलकर, ऋतुजा घांडगे, वसंत सामंत, अतूल पंचवाडकर, नारायण खांडसकर, अदिती आव्हाड तर मनाचे श्लोक प्रचारासाठी चंद्रकांत जाधव पाटील, सुपर्णा सरदेसाई, यामिनी राठी तर ज्युडो कराटे प्रशिक्षणासाठी डॉ. प्रमोद खाडीलकर, योगेश नेने, संदीप जाधव, योगविद्या साठी प्रिया प्रमोद जोशी यांचा सन्मानचिन्ह, शाल व श्रीफळ त्यांच्या निष्ठावंत कार्य कौशल्याचा गौरव करण्यात आला होता.

या कार्यक्रमा साठी विदेशात हिंदुत्वाचा व भारताच्या संस्कृतीचा सुगंध दरवळत ठेवणारे श्रीनारायणजी चांडक, तसेच समाज सेवक सुशिल जी अग्रवाल, मधुसूदन राठी, सुनिल गोयल, ओमचांडक व श्रीभगवती मंदिराचे अनेक भक्तगण, श्रीबालाजी भजनी मंडळाचे सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ.श्याम कुलकर्णी यांनी केले. तर आभार प्रदर्शन व व्यवस्थापनाचे कार्य गिरीधर राठी व प्रकाशराव बोकील यांनी केले.

कवयित्री प्रिया धारूरकर यांच्या चाहुलींचे अनवट नाद कवितासंग्रहाचे १५ फेबुवारी रोजी प्रकाशन

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर : कवयित्री प्रिया धारूरकर यांच्या चाहुलींचे अनवट नाद या कवितासंग्रहाचे प्रकाशन रविवार, १५ फेब्रुवारी रोज होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ लेखिका आणि कवयित्री प्रा. ललिता गादगे उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती कवयित्री प्रिया धारूरकर यांनी दिली.



छत्रपती संभाजीनगर येथील समर्थनगरमधील शासकीय ग्रंथालया शेजारच्या गांधी भवनात सायंकाळी साडेपाच वाजता हा कार्यक्रम होईल. कवयित्री प्रिया धारूरकर यांच्या आई मालती राघवेंद्र मुरुगकर यांच्या हस्ते या कवितासंग्रहाचे प्रकाशन होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पी. विठ्ठल यांचे भाष्य

काव्यसंग्रहाच्या प्रकाशन सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून छत्रपती संभाजीनगरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. सर्जेराव आत्माराम जिगे उपस्थित राहणार आहेत. तर नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख आणि सुप्रसिद्ध कवी डॉ. पी. विठ्ठल या कवितासंग्रहावर भाष्य करतील. या कार्यक्रमाला रसिकांनी उपस्थिती लावावी, असे आवाहन अक्षरसूक्त साहित्य मंडळ, मुक्तसृजन साहित्य संस्था, कैलास पब्लिकेशन आणि शताब्दी काव्य मंडळाने केले आहे.

विदेही ते घन दाटले

प्रिया धारूरकर यांचे विदेही, अंगभरून वाहणाऱ्या पान्ह्यातून हे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांचा घन दाटले स्वर हा ललित लेख संग्रह प्रसिद्ध आहे. पहिल्या दोन दशकांमधील मराठी कवितेतील स्त्री जाणिवांना समृद्ध करणाऱ्या त्या एक महत्त्वाच्या कवयित्री आहेत. तरल संवेदनांना चिंतनगर्भ आशय प्रदान करणारी त्यांची मांडणी लक्षणीय आहे. अनिवार आणि अलवार प्रेमातील समंजसपणा अंतिमतः माणूस म्हणून स्व चा घेतलेला शोध आहे.स्त्री हे अभिव्यक्तीचे स्त्रोत असले, तरी त्यापुढे जाऊन मानवीमूल्य प्रस्थापित करणारी त्यांची कविता आहे.

कॉपीची कुप्रथा

आपल्याकडे फेब्रुवारी - मार्च हा परीक्षांचा काळ असतो. या महिन्यात परीक्षा पार पाडण्याची जणू परंपराच आहे. दहावी - बारावी या बोर्डाच्या परीक्षा याच काळात असतात. इतकेच काय तर शिष्यवृत्ती, नवोदय, मंथन यासारख्या स्पर्धा परीक्षा देखील याच काळात होतात. यावर्षी बारावीची बोर्ड परीक्षा १० फ ेब्रुवारी पासून सुरू झाली असून ती ११ मार्चला संपणार आहे तर दहावीची परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च दरम्यान होणार आहे. या परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील मैलाचा दगड असतात. विद्यार्थ्यांच्या जीवनाला कलाटणी देणाऱ्या या परीक्षा असतात. दरवर्षी लाखो विद्यार्थी या परीक्षेला बसतात. यावर्षीही लाखो विद्यार्थी दहावी - बारावीची परीक्षा देणार आहेत. ज्या विद्यार्थ्यांनी वर्षभर मन लावून अभ्यास केलाय ते विद्यार्थी या परीक्षांना बेधडकपणे सामोरे जातात मात्र ज्या विद्यार्थ्यांचा पुरेसा अभ्यास झाला नाही ते विद्यार्थी गैरमार्गाने ही परीक्षा उत्तीर्ण होण्याचा प्रयत्न करतात. त्यातीलच एक गैरमार्ग म्हणजे कॉपी. दहावी बारावीच्या परीक्षेत दरवर्षी हजारो विद्यार्थी कॉपी करताना आढळतात. काहींवर कारवाई होते तर काहींना समज देऊन सोडून दिले जाते मात्र कॉपीची ही किड मुळापासून उखडून टाकली जात नाही. कॉपी ही आपल्या शिक्षण व्यवस्थेला लागेलेली किड आहे. वर्षभर अभ्यास न करता परीक्षेच्या दिवशी कॉपी करून उत्तीर्ण होण्याकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत आहे. ही धोक्याची घंटा आहे म्हणूनच खुद्द पंतप्रधानांना देखील यात लक्ष घालावे लागले होते. मागील वर्षी मन की बात या आपल्या कार्यक्रमात पंतप्रधानांनी याच विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले होते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून लाखो विद्यार्थ्यांना पंतप्रधानांनी कॉपी केल्याने आयुष्य घडवता येत नाही असा कानमंत्र दिला होता. कॉपी करून आपण एखादी परीक्षा उत्तीर्ण होऊ शकतो मात्र जीवनाच्या परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी कॉपी नव्हे तर अपार मेहनतच करावी लागते. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर मेहनतीला पर्याय नाही असा संदेशही पंतप्रधानांनी विद्यार्थ्यांना दिला होता मात्र विद्यार्थ्यांनी पंतप्रधानांचा हा संदेश अंमलात आणला नाही असेच म्हणावे लागेल कारण सध्या चालू असलेल्या बारावीच्या परीक्षेत राज्यातील अनेक भागात मास कॉपी झाल्याची बातमी वर्तमानपत्रात वाचायला मिळाली. बीड, जालना यासारख्या शहरात कॉपीमुक्त परीक्षा या शिक्षण विभागाच्या अभियानाला हरताळ फासला गेला. अनेक परीक्षा केंद्रावर विद्यार्थी कॉपी करताना आढळले. काही परीक्षा केंद्रावर मास कॉपी होत असल्याचा व्हिडिओ देखील व्हायरल झाला. याप्रकरणी काही पर्यवेक्षक आणि केंद्र संचालकांवर शिक्षण विभागाने कारवाई देखील केली आहे. दहावी - बारावी परीक्षेत कॉपी होऊ नये यासाठी शिक्षण विभाग विविध पावले उचलत असताना विद्यार्थ्यांकडून त्यास पुरेसा प्रतिसाद मिळत नाही असेच म्हणावे लागेल. दरवर्षी कॉपी करणाऱ्या मुलांची संख्या वाढतच चालली आहे. कॉपीची कुप्रथा कमी होण्याऐवजी वाढतच चालली आहे. वर्षभर अभ्यास न करणारे विद्यार्थी कॉपीच्या या कुप्रथेचे आवर्जून पालन करतात. काही ठिकाणी तर काही शाळा आणि संस्था देखील निकाल चांगला लागावा म्हणून या कुप्रथेला प्रोत्साहन देतात. काही पालकही आपल्या पाल्यांना कॉपी पुरवण्यासाठी जीवाचे रान करतात. शाळेच्या, परीक्षा हॉलच्या बाहेर कॉपी पुरवण्यासाठी तोबा गर्दी उसळते. झेरॉक्स दुकानांवर देखील तेवढीच गर्दी असते. अर्थात परीक्षेत कॉपी होऊ नये म्हणून प्रशासन सर्वोतोपरी प्रयत्न करते हे मान्यच करावे लागेल. राज्यात कॉपीमुक्त परीक्षा व्हावी यासाठी प्रशासनाकडून विविध प्रकारचे अभियान राबवले जाते. भरारी पथक हे त्यापैकीच एक अभियान. बोर्डाच्या परीक्षा सुरू असताना काही अधिकारी बोर्डाकडून नेमले जातात. हे अधिकारी परीक्षा केंद्रावर अचानक भेटी देऊन परीक्षा केंद्रावर धाक बसवतात. कॉपी करताना कोणी विद्यार्थी आढळला तर त्याच्यावर कारवाई केली जाते. त्यांचे थेट निलंबन केले जाते. पण कॉपी बहाद्दरांना तुरुंगात टाकण्याची तरतूद आपल्याकडील कायद्यात नाही मात्र देशातील काही राज्यात कॉपी करणाऱ्या विद्यार्थ्यांना थेट तुरुंगात पाठवण्याचा कायदा आहे. आपल्याकडे देखील आता कॉपी करणाऱ्या विद्यार्थ्यांना वचक बसावा आणि राज्यात कॉपीमुक्त परीक्षा व्हाव्यात यासाठी राज्यसरकार प्रयत्न करत आहे. त्यासाठी त्यांनी अनेक कठोर निर्णय घेतले आहेत. कॉपीमुक्त अभियानासाठी राज्यसरकार जे प्रयत्न करीत आहे ते स्वागतार्ह असले तरी कठोर कायदे करूनच कॉपिला आळा घालता येईल असे नाही तर कॉपी करू नये यासाठी विद्यार्थ्यांचे प्रबोधनही करायला हवे. कॉपी करणारा विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण होऊ शकतो मात्र जीवनाच्या परीक्षेत तो उत्तीर्ण होऊ शकत नाही. जीवनाच्या प्रत्येक पावलावर परीक्षा असतात . त्यात उत्तीर्ण होण्यासाठी कॉपी नव्हे तर कठोर मेहनतच घ्यावी लागते. कठोर मेहनतीशिवाय फळ मिळत नाही. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर कॉपिसारख्या कुप्रथेला मूठमाती द्यावीच लागेल.

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559